सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

## (अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर)

"वनभवन", रामगिरी रोड, पोलिस जिमखाना शेजारी, सिव्हिल लाईन्स, नागपूर- ४४० ००१, दूसरा माळा, "सी" विंग

E-mail ID pccfbpd@mahaforest.gov.in

Phone No : ०७१२-२५५०६७५

---

**क्रमांक कक्ष-२(१)/असं/प्र.क्र.०१(भाग-१)/१४५/२०२३-२४, दिनांकः-२८/०७/२०२३**

**विषयः- वन विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन वेळेत अदा करणेबाबत.**

उपरोक्त विषयांकित प्रकरणांचे अनुषंगाने कळविण्यात येते की, वन विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन वेळेत अदा करणेकरिता अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BDS वर) उणे (-) प्राधिकार पत्र निघत नसल्याने वनवृत्तस्तरावरून दरमहा ०१-वेतन या सविस्तर शिर्षात अनुदान मागणी या कार्यालयास नोदविण्यात येत असते. सदरहू मागणीचे अनुषंगाने शासनस्तरावरून दरमहा प्राप्त झालेले अनुदानास अनुसरून सर्व वनवृत्तांना वेळोवेळी अनुदान वितरीत करण्यात येते. असे असुन देखील आपले अधिनस्त सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन वेळीच अदा होत नसल्याबाबत ब-याच कर्मचारी संघटनांमार्फत तसेच ब-याच वनवृत्तस्तरावरील अधिका-यामार्फत कळविण्यात आले आहे.

तथापी आपले मार्फत केलेली अनुदान मागणी व शासनस्तरावरून प्राप्त झालेले अनुदान यात योग्य ताळमेळ होत नसल्यामुळे बरेचदा काही विशिष्ट योजनेत्तर योजने अंतर्गत पूर्वी वितरीत केलेले अनुदान चालू महिन्याच्या वेतनाकरिता वनवृत्तांमार्फत केलेली अनुदान मागणी परिपूर्ण करणेकरिता वनवृत्तस्तरावर व त्यांचे अधिनस्त कार्यालयाचेस्तरावर शिल्लक असलेले अनुदान WITHDRAWAL करून सदरचे अनुदान वनवृत्तांच्या मागणीनुसार पूर्नवाटप केले जाते. या सर्व बांबीमुळे वनविभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन वेळेवर अदा होण्यास विलंब होतो. या सर्व बाबी विचार घेऊन सर्व नियंत्रक अधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सुचना खालील प्रमाणे आहेत.

१. आपले कार्यालयाचे तसेच अधिनस्त वनविभागात असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन वेळेवर अदा करणेकरीता विशेष प्रयत्न करावे.

२. मागणी नोंदवतांना आपले व आपल्या अधिनस्त कार्यालयात पूर्वी वितरीत करण्यात आलेल्या अनुदानापैकी किती अनुदान शिल्लक आहे याबाबतचा आढावा घेऊन शिल्लक अनुदान वनवृत्तस्तरावर WITHDRAWAL करून पुढील महिन्याचे वेतनाकरिता फेरवाटप करावे.

३. तद्नंतरच सर्व नियंत्रक अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना दरमहा आवश्यक असलेल्या अनुदानाचीच मागणी योजनेत्तर योजना निहाय करावी.

28/07/2023

**(पी. कल्याण कुमार)**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास),**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजीव वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) प.मुंबई / पु.नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती / नाशिक / ठाणे / पुणे /कोल्हापूर
वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली / यवतमाळ / धुळे / औरंगाबाद / नागपूर / चंद्रपूर
वनसंरक्षक, मुल्यांकन, महाराष्ट्र राज्य, नागपूर
वनसंरक्षक (कार्य आयोजना) पश्चिम पुणे / पूर्व नागपूर
वनसंरक्षक, वाहतूक व विपणन, बल्लारशाह
उपवनसंरक्षक, भूमी अभिलेख, पश्चिम प्रदेश, पनवेल
प्रशासकिय अधिकारी, कक्ष-१३, प्र.मु.व.सं.(वन बल प्रमुख) म.रा.नागपूर यांचे कार्यालय